पुरोगामी विचाराचे
एकमत
page- 5
07 Aug 2026

# रेणा सहकारी साखर कारखाना लि., दिलीपनगर
## निवाडा, ता. रेणापूर, जि. लातूर

मोबा. ९५६१२ १४३०१, ९१६८५ ९९९०० Website: www.renasuagr.com

जा.क्र./रेणा/सा. प्रशासन/वा. स. सभा/६७४/२०२६–२७ दि. ०६.०८.२०२६

## अधिमंडळाच्या २४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस
## (फक्त सभासदांसाठी)

स. न. वि. वि.,

सर्व सभासद बंधू व भगिनींना कळविण्यात येते की, रेणा सहकारी साखर कारखाना लि., दिलीपनगर, निवाडा, ता. रेणापूर, जि. लातूर या संस्थेची सन २०२५–२६ या आर्थिक वर्षाची मा. अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार, दि. २२.०८.२०२६ रोजी दुपारी ठीक २.०० वाजता, वैष्णव हॉटेल बॅक्वेटस हॉल, साई नाका, डी मार्ट रोड, लातूर येथे कारखान्याचे चेअरमन मा. श्री. अनंतराव दौलतराव ठाकूर (देशमुख) यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केलेली आहे.

तरी सदर सभेस सभासदांनी उपस्थित रहावे, ही नम्र विनंती.

**: सभेपुढे येणारे विषय :**

१. मागील अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा दि. २७.०९.२०२५ च्या सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२. दि. ०१.०४.२०२५ ते ३१.०३.२०२६ या कालावधीतील कामकाजाबद्दल संस्थेच्या मा. संचालक मंडळाने सादर केलेला अहवाल स्वीकारणे व नोंद घेणे.

३. दिनांक ०१.०४.२०२५ ते ३१.०३.२०२६ या कालावधीतील नफा–तोटा पत्रकास व दि. ३१.०३.२०२६ अखेरचे ताळेबंद पत्रकास मा. संचालक मंडळाने केलेल्या शिफारशीनुसार मंजुरी देणे.

४. दि. ०१.०४.२०२५ ते ३१.०३.२०२६ या कालावधीतील हिशोबाचा वैधानिक लेखापरीक्षक मे. दारफळकर टोळे अँण्ड कंपनी, चार्टर्ड अकाऊंटंट, लातूर यांनी सादर केलेल्या वैधानिक लेखापरीक्षण अहवालाची नोंद घेऊन त्यानुसार संस्थेकडून सादर करावयाचा दोष दुरूस्ती अहवाल मा. संचालक मंडळाच्या मान्यतेने सादर करण्यास मंजुरी देणे व साल सन २०२४–२५ च्या हिशोब तपासणी अहवालानुसार मा. संचालक मंडळाच्या मंजुरीने दाखल केलेल्या दोष–दुरूस्ती अहवालाची नोंद घेणे.

५. आर्थिक वर्ष सन २०२५–२६ च्या अंदाजपत्रकापेक्षा कमी/अधिक झालेल्या खर्चास मंजुरी देणे व आर्थिक वर्ष सन २०२६–२७ वर्षाकरिता मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या अंदाजपत्रकाची नोंद घेऊन त्यास मान्यता देणे.

६. आर्थिक वर्ष सन २०२६–२७ साठी शासनमान्य लेखापरीक्षकांच्या नामतालिकेमधील लेखापरीक्षकाची नेमणूक व लेखापरीक्षण शुल्कासंदर्भात मा. संचालक मंडळाने केलेल्या शिफारशीस मान्यता देणे.

७. आर्थिक वर्ष सन २०२६–२७ साठी आयकर, जी. एस. टी कर–सल्लागार व अंतर्गत लेखापरीक्षक यांची मा. संचालक मंडळाने केलेल्या शिफारशीनुसार लेखापरीक्षकांची नेमणुकीस व शुल्कास मान्यता देणे.

८. स्मृतीसंग्रहालय, स्पर्धा परीक्षा केंद्र व ग्रंथालयासाठी सन २०२५–२६ मध्ये प्रत्यक्ष झालेल्या खर्चाची नोंद घेऊन त्यास कार्योत्तर मान्यता देणे व सन २०२६–२७ मध्ये मा. संचालक मंडळाच्या मंजुरीने कराव्या लागणाऱ्या संभाव्य खर्चास मंजुरी देणे.

९. कारखाना आदर्श उपविधीतील कलम ५८ नुसार तक्रार निवारण समितीबाबत मा. संचालक मंडळाने केलेल्या शिफारशीनुसार मंजुरी देणे.

१०. कारखाना सभासद व कर्मचारी यांना सवलतीच्या दराने साखर विक्री करणेबाबत मा. संचालक मंडळाने केलेल्या शिफारशीनुसार निर्णय घेणेबाबत.

११. गाळप हंगाम २०२५–२६ मधील एफ. आर. पी. संदर्भात केंद्र शासन व मा. साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे व मा. संचालक मंडळाने केलेल्या शिफारशीनुसार अंतिम ऊस दरास मान्यता देणेबाबत.

१२. संचालक मंडळ सभा क्र. ०१ दि. २९.०४.२०२५ मधील मंजुरीनुसार कारखान्याने १५ नवीन हार्वेस्टर संच खरेदीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेणे.

१३. ऊस लागवड हंगाम २०२६–२७ मध्ये आवश्यकतेनुसार ऊस विकासाच्या योजना राबवण्यास मान्यता देणेबाबत.
१४. कारखान्याचे स्क्रॅप मटेरीयलची विक्रीबाबत केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणेबाबत.
१५. उपविधी क्र. ५७ अन्वये सन २०२५–२६ चे नफा गंगाजळीत समायोजन करणेबाबत मा. संचालक मंडळाने केलेल्या शिफारशीनुसार मान्यता देणेबाबत.
१६. कारखान्याचे नवीन ७ TPD Bio-CNG प्रकल्प व २५ TPD-CO2 प्रकल्प उभारणीचे अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेणे.
१७. कारखान्याचे नवीन १२०० के. एल. पी. डी. सी. पी. यु. (साखर) प्रकल्पाचे अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेणे.
१८. वार्षिक अहवाल व आर्थिकपत्रके कारखाना वेबसाईटवर प्रसिध्द करून मा. सभासदांना अवगत करणे तसेच इतर डिजिटल माध्यमाद्वारे मा. सभासदांना पाठविणेबाबत मा. संचालक मंडळाने घेतलेल्या निर्णयांची नोंद घेणे.
१९. मा. अध्यक्षांच्या अनुमतीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयावर विचार करणे.

**दिनांक : ०६.०८.२०२६**
**स्थळ : कारखाना साईट, दिलीपनगर, निवाडा**

**मा. संचालक मंडळाच्या आदेशावरून**
**स्वाक्षरित/-**
**(बी. व्ही. मोरे)**
**कार्यकारी संचालक**

**विशेष सूचना :**

१. प्रवेश देणे सोयीचे व्हावे म्हणून सभासदांनी सभेस येताना विहीत ओळखपत्र बरोबर आणावे व संस्था प्रतिनिधींनी सभेस येताना संस्थेचा प्राधिकृत केलेला ठराव सोबत आणावा.
२. अहवाल सालातील संस्थेच्या कामाविषयी योजनात्मक व धोरणात्मक सूचना करावयाची असेल किंवा प्रश्न विचारावयाचे असल्यास त्यांनी त्यांचे प्रश्न लेखी स्वरूपात दि. १७.०८.२०२६ पर्यंत कारखान्याच्या कार्यालयीन वेळेत मिळतील अशा बेताने पाठवावेत. ऐनवेळी विचारलेल्या प्रश्नांचा विचार केला जाणार नाही.
३. उपविधीतील पोट नियम क्र. २३ नुसार अधिमंडळाच्या सर्वसाधारण सभेच्या वेळी एकूण सभासदांपैकी एकदशांश इतके अगर १०० सभासद (यापैकी जी संख्या कमी असेल) हजर असल्यास सभेची गणपूर्ती झाली असे समजण्यात येईल. गणपूर्तीअभावी ही सभा दोन तास पुढे ढकलण्यात येईल. पुढे ढकललेल्या वेळी गणपूर्ती झाली नाही तरी सभेची कामे गणपूर्ती शिवाय पार पाडले जातील.
४. सदर अहवाल सभासदांना वेळेत मिळावा म्हणून रजिस्टर्ड पोस्टाने पाठवण्याऐवजी कारखान्याच्या www.renasugar.com या वेबसाईटवर प्रसिध्द करून सभासदांनी कारखान्याकडे दिलेल्या व्हॉट्सअॅप नंबरवर PDF फाईलद्वारे पाठवत आहोत तसेच या व्यतिरिक्त ज्या सभासदांना वरील डिजिटल माध्यमाद्वारे अहवाल उपलब्ध झाला नाही अशा सभासदांनी कारखान्याच्या प्रशासकीय कार्यालयामध्ये व कारखान्याच्या शेतकी गट ऑफिसमध्ये छापिल अहवालाच्या प्रती अवलोकनार्थ उपलब्ध आहेत.
५. सभासदांनी कारखाना उपविधी व कायद्यातील लागू तरतुदीचे पालन करणे आवश्यक आहे.
६. **स्नेहभोजन वेळ :** सकाळी ११.३० ते दुपारी १.३० वाजेपर्यंत
**स्थळ :** वैष्णव हॉटेल बॅक्वेटस हॉल, साई नाका, डी मार्ट रोड, लातूर

Site Maintain by IEPL